दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.११ ऑगस्ट २०२६ । अहिल्यानगर । पान नं.

# दूध भेसळ रॅकेटप्रकरणी अजून दहा जणांना अटक

## मंचर पोलिसांच्या कारवाईत आरोपींची संख्या २४ वर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मंचर** : राज्यातील दूध भेसळ रॅकेटचा पुणे ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केल्यानंतर या प्रकरणाच्या तपासाला वेग आला असून, मंचर पोलिसांनी आणखी दहा जणांना अटक केली आहे. या कारवाईमुळे दूध भेसळ प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता २४ वर पोहोचली आहे. नव्याने अटक केलेल्या आरोपींकडून भेसळीचे साहित्य घेण्यात येत असल्याचे तपासात समोर आले असून, त्यांचे मुख्य सूत्रधार सुशांत हिंगे याच्याशी असलेले आर्थिक संबंध तपासले जात आहेत.




अन्न व औषध प्रशासन आणि पुणे ग्रामीण पोलिसांनी ४ जुलै रोजी राज्यातील पाच जिल्ह्यांत एकाच वेळी छापेमारी करून दूध भेसळ रॅकेटचा पर्दाफाश केला होता. या कारवाईनंतर अनेक संशयितांना अटक करण्यात आली होती. आता यापूर्वी अटक केलेल्या आरोपींकडून भेसळीचे साहित्य घेणाऱ्या आणखी दहा जणांचा पोलिसांनी शोध घेत त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. वास न येणारा शाम्पू, दूध पावडर, विविध रसायने आणि इतर पदार्थांचा वापर करून दुधात भेसळ केली जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

नव्याने अटक करण्यात आलेल्या दहा आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या आरोपींकडून भेसळीचे साहित्य कोणाकडून घेतले जात होते, त्याचे वितरण कुठे केले जात होते आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार सुशांत हिंगे याचीही नव्या आरोपींसमवेत संयुक्त चौकशी करण्यात येणार आहे. यापूर्वी मुख्य गुन्ह्यातील १४ व्या आरोपीला ३१ जुलै रोजी अटक करण्यात आली होती. त्याच्या चौकशीत सुशांत हिंगे याच्याशी संबंध असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी न्यायालयीन कोठडीत असलेल्या हिंगेला तपासासाठी पुन्हा पोलीस कोठडीत घेतले आहे. सुशांत हिंगे हा राष्ट्रवादी काँग्रेसचे आंबेगाव तालुकाध्यक्ष, पुणे जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष व विद्यमान जिल्हा परिषद सदस्य विष्णू हिंगे यांचा पुतण्या आहे. विष्णू हिंगे हे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे निकटवर्तीय मानले जातात. या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे वळसे पाटील यांनी यापूर्वी स्पष्ट केले असून, संबंध आढळल्यास राजकीय व सामाजिक जीवनातून निवृत्ती घेण्याची भूमिकाही त्यांनी जाहीर केली आहे.

दरम्यान, पोलिसांच्या संयुक्त चौकशीतून रॅकेटमधील आर्थिक व्यवहार आणि अन्य सहभागींची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# गॅरेजसाठी पाच लाखांची मागणी

## पतीसह सात जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : गॅरेजचे दुकान सुरू करण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आणावेत, या कारणावरून विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी विवाहितेच्या फिर्यादीवरून पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पल्लवी तुषार दळे (वय २४, रा. मांडवे, ता. श्रीरामपूर, सध्या रा. चांदा, ता. नेवासा) यांनी याबाबत फिर्याद दिली आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३) व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, दि. ३१ मे २०२५ रोजी दुपारी २ वाजल्यापासून ते दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत मांडवे, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथे हा प्रकार घडला. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपींमध्ये पती तुषार दिगंबर दळे , सासू संगीता दिगंबर दळे , सासरे दिगंबर दगडू दळे,नणंद अश्विनी सचिन जोजे, नंदाई सचिन नामदेव जोजे,शुभांगी अनिल जोजे, अनिल नामदेव जोजे यांचा समावेश आहे. गॅरेजचे दुकान टाकण्यासाठी फिर्यादीने तिच्या आई-वडिलांकडून पाच लाख रुपये घेऊन द्यावेत, अशी मागणी करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पैसे आणण्याच्या मागणीवरून फिर्यादीचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला, शिवीगाळ व मारहाण करण्यात आली, तसेच जिवे मारण्याची धमकी देऊन उपाशीपोटी ठेवून त्रास दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्यादीने १० ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४.०५ वाजता सोनई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. गुन्ह्याचा तपास सपोनि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस हवालदार एस.बी चौधरी करीत आहेत. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# बनावट कागदपत्रांद्वारे वेतन लाभ, ११ शिक्षकांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : शिक्षकांच्या शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू असतानाच देवळाली कॅम्प येथील डॉ. सुभाष गुजर हायस्कूलमधील वेतननिश्चितीचा गैरप्रकार समोर आला आहे. बनावट कागदपत्रे तयार करत वेतननिश्चिती करून घेत संस्था तसेच शासनाची फसवणूक केल्याबाबत ११ शिक्षकांविरुद्ध देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शंकर एज्युकेशन सोसायटीचे सचिव रतन राजलदास चावला यांच्या फिर्यादीनुसार, डॉ. सुभाष गुजर हायस्कूलमध्ये २००१ ते २०२२ या कालावधीत हा प्रकार घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. वेतननिश्चितीसाठी जिल्हा परिषद तसेच शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे अधिकृत पत्रव्यवहार किंवा मान्यता ठराव सादर केलेला नसतानाही संबंधित शिक्षकांनी खोटी व बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप आहे. त्याआधारे वेतननिश्चिती करून घेतल्याने संस्था व शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत पोलिसांनी फसवणूक व गुन्हेगारी कटाचा गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक पाडेकर तपास करत आहेत.

# संगमनेरात बनावट दारूचा पर्दाफाश; ५.३८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर शहरात गोवा बनावटीच्या व महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या मद्याची अवैध तस्करी, बनावट मद्य निर्मिती व विक्री करणाऱ्या शिवाजी नगर परिसरातील एका घरावर छापा टाकून गोवा बनावटीच्या दारूचे ३४ बॉक्स, विविध नामांकित ब्रँडच्या रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे आणि दुचाकी असा तब्बल ५ लाख ३८ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात केला आहे.



संगमनेर शहरातील नेहरू चौक येथील सुरभी या दारूच्या दुकानात विक्री केली जात असल्याचे पोलीस तपासात उघड झाले असून पोलीस अधिकाऱ्यांनी शिवकुमार मनोज कुमार कालडा व सौरभ अरविंद पापडेजा, दोघेही रा. संगमनेर यांना अटक करण्यात आली असून त्या दोघांनाही तीन दिवसाचे पोलीस कोठडी सुनावली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलीस पथकाने ताब्यात घेतलेल्या कालडा आणि पापडेजा या दोघांची चौकशी केली बनावट पद्धतीने तयार केलेले मद्य नेहरू चौकातील हॉटेल सुरभी एफ. एल.-३ (परवाना क्र. १९३ ) येथे विक्रीसाठी पाठविण्यात आले असल्याची माहिती तपासात पुढे आली.त्यानंतर पथकाने हॉटेल सुरभी दारू दारू विक्रीच्या दुकानावर छापा टाकून हजार ३१० रुपये किमतीच्या बनावट दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. त्यामुळे बनावट दारूच्या या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. त्यांच्या ताब्यातून ‘रॉयल इम्पॅक्ट’ व्हिस्कीचे तब्बल ३४ बॉक्स, विविध नामांकित ब्रँडच्या रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

### भरारी पथकाची कारवाई

ही धडक कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक योगेश सावखेडकर, उपनिरीक्षक प्राची देखणे, उपनिरीक्षक प्रशांत गायकवाड तसेच वसंत पालवे, विपुल कर्पे, विमल घोलप, स्वाती फटांगरे, मोहिनी घोडेकर, सचिन बटुळे आणि ओंकार पालवे यांच्या भरारी पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास उपनिरीक्षक प्राची देखणे करीत आहेत.

# माका घरफोडीतील आरोपी जेरबंद ;

## १० तोळे सोन्याचे दागिने विकल्याचा खुलासा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : माका (ता. नेवासा) येथील आखाडे वस्तीवर रात्री घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या टोळीतील एका आरोपीला अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने खानापूर (ता. शेवगाव) परिसरातून जेरबंद केले. दिनेश उर्फ राजा सखाराम काळे (वय ४७, रा. रहाटगाव, ता. पैठण) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला नेवासा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पोलिसांच्या माहितीनुसार, २३ जुलै रोजी अभिषेक साहेबराव आखाडे हे कुटुंबीयांसह घरात झोपलेले असताना चोरट्याने खिडकी उघडून घरात प्रवेश केला. कपाट फोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करण्यात आली. याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्यानंतर पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपास सुरू केला. ९ ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीवरून खानापूर परिसरात सापळा रचून दिनेश काळे याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने अमोल बिरजू भोसले व काळु बिरजू भोसले यांच्या साथीने मोटारसायकलवरून माका येथे येऊन घरफोडी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीतील सुमारे १० तोळे सोन्याचे दागिने पैठण येथील सोनाराला विकल्याचेही तपासात समोर आले. उर्वरित दागिने अमोल भोसलेकडे असल्याचे आरोपीने सांगितले. दोन्ही साथीदार फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव करीत आहेत.

# ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत लांबवली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : परिसरात दिवसाढवळ्या चोरीची धक्कादायक घटना घडली असून, एका ७० वर्षीय ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातून एक तोळ्याची सोन्याची पोत हिसकावून दोन अज्ञात चोरट्यांनी पोबारा केला आहे. बुधवारी (५ ऑगस्ट) सायंकाळी ५:१५ वाजेच्या सुमारास आश्वी-प्रतापपूर रस्त्यावरील आंधळे पेट्रोल पंपाशेजारी ही घटना घडली. पोलीसाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शकुंतला गंगाधर चतुरे (वय ७०, रा. प्रतापपूर) या आंधळे पेट्रोल पंपाजवळ चहा विक्रीचा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात. बुधवारी सायंकाळी नेहमीप्रमाणे त्या दुकानात असताना, दोन अज्ञात इसम त्या ठिकाणी चहा पिण्याच्या बहाण्याने तेथे आले. त्यांनी दुकानात गर्दी नसल्याचा फायदा घेत शकुंतला यांच्या गळ्यातील सुमारे ४० हजार रुपये किंमतीची व एक तोळा वजनाची सोन्याची पोत (दहा ते १२ वर्षांपूर्वी विकत घेतलेली) बळजबरीने हिसकावून घेतली आणि क्षणात दुचाकीवरून पसार झाले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी शकुंतला चतुरे यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा रजिस्टर नंबर १६२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आश्वी परिसरात दिवसाढवळ्या घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या चोरट्यांना जेरबंद करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# बेलापूर पोलिसांनी दाखविले कौशल्य!

## मोलमजुरी करणाऱ्या महिलेचे चोरलेले गंठण पोलिसांनी काही तासांत शोधले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : 'मुलीच्या लग्नासाठी' पाई-पाई जमवून आणि मोलमजुरी करून तयार केलेले सोन्याचे गंठण चोरीला गेल्याने हवालदिल झालेल्या महिलेचे बेलापूर पोलिसांनी आपल्या अनोख्या कौशल्याच्या जोरावर अवघ्या 'काही तासांत' ते परत मिळवून दिले आहेत. पोलिसांच्या या कामगिरीमुळे त्या गरीब कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा झाला असून, सर्वत्र पोलीस प्रशासनाचे कौतुक केले जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील लजपतरायवाडी (एकलहरे) येथील रहिवासी असलेल्या हिना विलास गोसावी यांनी दिवसरात्र मोलमजुरी करून आपल्या मुलीच्या लग्नासाठी एक सोन्याचे गंठण बनवले होते. हे गंठण सुरक्षित राहावे म्हणून त्यांनी घरातील दिवाणमधील



कपड्यांच्या आत लपवून ठेवले होते.परंतु, शनिवारी दुपारी नेहमीप्रमाणे कामावरून घरी आल्यानतर कोणीतरी दिवाणाची उचकपाचक केल्याचे लक्षात आले.

त्यांनी तेथे पाहणी केली असता, गंठण ठेवलेल्या ठिकाणी नसल्याचे त्यांच्या लक्षात आले.तातडीने विलब न करता पोलिसांकडे धाव घेतली असता यावेळी नातेवाईकांनी आणि कुटुंबाने संपूर्ण घर पालथे घातले, पण गंठण कोठेही सापडले नाही.गोसावी या पोलीस ठाण्यात पोहोचताच त्यांचे अश्रू अनावर झाले आणि त्यांनी अक्षरशः हंबरडा फोडला.पोलिसांनी घडलेला प्रकार जाणून घेतला असता त्याकामी 'पोलिसांची तत्परता आणि अन् सुचिलेली युक्ती' वापरली वापरून त्यावेळी पोलीस ठाण्यात उपस्थित असलेले हवालदार गणेश भिंगारदे, मनोज गोसावी आणि बाळासाहेब कोळपे, संपत बडे यांनी महिलेला धीर दिला.या दोन्ही हवालदारांना जिल्हा गुन्हे अन्वेषण विभागात काम केल्याचा दांडगा अनुभव असल्याने त्यांनी तात्काळ ही गंभीर बाब श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या निदर्शनास आणून दिली.

पो.नि.खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ लजपतरायवाडी गाठली, यावेळी हवालदार गणेश भिंगारदे, मनोज गोसावी, बाळासाहेब कोळपे,पोलीस कॉन्स्टेबल संपत बडे,भारत तमनर,नंदकिशोर लोखंडे,जालिंदर माने,आकाश वाघमारे,चोराची पोलिसांची घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर हा चोर बाहेरचा नसून घराजवळील किंवा परिचयातीलच कोणीतरी असावा, असा संशय भिंगारदे आणि गोसावी यांना आला. पोलिसांनी तात्काळ परिसरातील नागरिकांना एकत्र केले अन.. खाकी खाष्ट भाषेत सज्जड दम भरला.पोलिसांनी तडाखा देत स्पष्ट केले की, चोर आमच्या लक्षात आला आहेत. त्याने गुपचुप गंठण आणून द्यावे, अन्यथा आम्ही तपास लावणारच आहोत. सर्वांचे बोटांचे ठसे घेतले जातील आणि श्वान पथक बोलाविले जाईल.जर, आम्ही शोध घेतला तर चोराला तुरुंगवास, पोलिसांचा मार आणि समाजात मोठी बदनामी सहन करावी लागेल. आम्ही पोलीस ठाण्यात जाऊन परत येतोय, तोपर्यंत गंठण जागेवर आणून ठेवा.

असा इशारा देऊन पोलीस पथक बेलापूर पोलीस ठाण्याकडे निघून गेले, तोपर्यंत चोराने गपचुप परत केले गंठण पोलिसांच्या या खाकी जरबचा असा काही परिणाम झाला. चोराने भीतीपोटी काही वेळातच ते गंठण पुन्हा त्याच दिवाणावर आणून ठेवले.जेव्हा मिनाबाईंना (हिनाबाई) अचानक दिवाणावर गंठण पुन्हा पाहायला मिळाले, तेव्हा त्यांच्या जीवात जीव आला आणि त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. बेलापूर पोलिसांच्या या संवेदनशील आणि सतर्क कामगिरीबद्दल सर्वस्तरांतून कौतुक केले जात आहेत.

### पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार

लेकीच्या अंगावरील दागिना सुरक्षित परत मिळाल्याचा आनंद गगनात मावेनासा झाल्याने या कुटुंबाने तातडीने बेलापूर पोलीस ठाणे गाठले. पीडित कुटुंबाने आणि ग्रामस्थांनी पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्यासह सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि आभार मानले. यावेळी, विलास गोसावी, शांताराम गोसावी, तुळशीराम हिंगे, माजी सरपंच गणेश उमाप यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.